पुढारी



कोल्हापूर : स्नेहमेळाव्यात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. शरदचंद्र साळुंखे, महादेवराव आडगुळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. नंदकुमार रानभरे आदी.

# माजी विद्यार्थ्यांनी पुस्तके भेट देऊन ज्ञानसंवर्धनाचे कार्य करावे

## डॉ. शिर्के : 'विवेकानंद'मध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास दरवर्षी पुस्तके भेट दिल्यास ग्रंथालय समृद्ध होऊन ज्ञानसंवर्धनाचे कार्य घडेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालय येथे माजी विद्यार्थी असोसिएशनच्या वतीने आयोजित स्नेहमेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केल्याने खेड्यापाड्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी फेसबुक, ई-मेलद्वारे संपर्क साधून नवीन शैक्षणिक उपक्रम राबविण्याविषयी सूचना देऊन सहकार्य करावे.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला.

न्यायाधीश पंकज रजपूत, माजी महापौर महादेवराव आडगुळे, प्रा. रमेश जाधव, पी. सी. पाटील, ऋतुराज क्षीरसागर, आर. एस. भोगम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. शरदचंद्र साळुंखे, प्रा. नंदकुमार रानभरे, शाहीर आझाद नायकवडी यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रभावती पाटील, प्रा. राजश्री पाटील यांनी केले. प्रा. धीरज शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
23 JAN 2019 पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बापूजींमुळे गोरगरिबांना शिक्षणाची संधी

## - डी. टी. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या ध्येयाने प्रेरित होऊन शहरासह ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचे भाग्य आम्हाला लाभले, असे विचार शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. मंगळवारी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी जुन्या बुधवार पेठेतील विवेकानंद कॉलेजच्या स्थापनेपासूनची माहिती दिली. बापूजींमुळे आज समाजात अनेक उद्योगपती, राजकारणी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, खेळाडू, लेखक, कवी, कलावंत, सैन्यदलातील अधिकारी निर्माण झाले आहेत. माजी महापौर महादेवराव आडगुळे, रमेश जादव, पी. सी. पाटील, ऋतुराज क्षीरसागर, आर. एस. भोगम, न्यायाधीश पंकज रजपूत यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शाहीर आझाद नायकवडी, शरदचंद्र साळुंखे, नंदकुमार रानभरे व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रभावती पाटील, राजश्री पाटील यांनी केले, तर आभार धीरज शिंदे यांनी मानले.

23 JAN 2019
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

प्रतिनिधी
जयसिंगपूर



जयसिंगपूर : आभार व्यक्त करताना डॉ. ए. व्ही. मोहोळकर, व्यासपीठावर प्र. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारी व डॉ. निलेश तारवाळ

शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित पार पडला. या परिषदेत देशविदेशातील १२ तज्ज्ञ व्याख्यात्यांचे मार्गदर्शन सहभागी संशोधक विद्यार्थ्यांना लाभले. १५० हुन अधिक संशोधकांनी त्यांचे संशोधन भित्तीपत्रकाद्वारे सादर केले. या भित्तीपत्रकाचे परीक्षण भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. विजया पुरी आणि रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. आर. एम. माने यांनी केले.

अखेरच्या सत्रात पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के तसेच भौतिकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

प्र. कुलगुरू शिर्के यांनी या परिषदेचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्दल परिषदेचे संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर व विभागातील इतर शिक्षक, संशोधक विद्यार्थी आणि सहभागी संशोधकांचे अभिनंदन केले. तसेच भारताचे पंतप्रधान यांनी पाठविलेल्या संदेशाचा संदर्भ देऊन युवकांनी त्यांचे संशोधन समाजकल्याणासाठी वापरावे, असे आवाहन केले.

**देश–विदेशातील व्याख्यात्यांचे मार्गदर्शन**

पारितोषिक विजेते कुणाल बोरसे, अमित भोसले, एस कोटरेश, डॉ. गणेश आगवणे, सत्यजित पाटील, अखिलेश पाटील यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान अधिशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. निलेश तारवाळ आदी मान्यवर उपस्थित होते. संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर यांनी आभार मानले.